विद्या प्रसारक मंडळाचे जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालय

टॅलेंट अण्ड कल्चरल कमिटी

स्वरांजली-स्वातंत्र्याचा सांस्कृतिक जागर (अहवाल)

दि.16/08/2022 मंगळवार, रोजी ठिक सकाळी 11.00 वाजता "हर घर तिरंगा "ह्या सरकारी अमृतमहोत्सवी सोहळ्या अंतर्गत राबविण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे पुष्प महाविद्यालयाच्या 'कात्यायन' सभागृहात 150 रसिकांच्या उपस्थितीत गुंफले गेले. संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ. विजय बेडेकर व प्रा. डॉ.सुचित्रा नाईक ह्यांच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला. ह्या प्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ.सुचित्रा नाईक मॅडम ,विद्या प्रसारक मंडळाचे सचिव मा. उत्तम जोशी सर,उपप्राचार्य डॉ. महेश पाटील सर,हर घर तिरंगा सल्लागार ग्रंथपाल नारायण बारसे सर, हर घर तिरंगा चे समन्वयक डॉ.दिपक साबळे सर , टॅलेंट व कल्चरल कमिटीच्या अध्यक्षा डॉ. मुग्धा बापट मॅडम उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात आरंभी प्रा. सुचित्रा नाईक मॅडमनी विद्यार्थ्यांना व प्रेक्षकवर्गाला उद्बोधित केले.'भारतीयत्व कायमस्वरुपी मनात रुजायला हवं, त्याकरता कर्तव्यदक्षता अंगिकारून जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने देशसेवा करावी, अशा आशयपर मार्गदर्शन करुन कार्यक्रमासाठी आशीर्वादपर शुभेच्छा दिल्या. त्याचबरोबर संस्थेचे सचिव उत्तम जोशी सरांनी अतीशय उत्तम मार्गदर्शन केले. शिक्षणाबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास आणि कलागुणांचा पुरस्कार करत आयोजलेल्या ह्या कार्यक्रमाचे कौतुक करून अनेक शुभेच्छा दिल्या.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवरायांवरील पोवाडा सादरीकरणाने झाली.त्याचबरोबर 55 व्या युवा महोत्सवात समूह गायन स्पर्धेत प्रथम फेरीत प्रथम क्रमांक पटकावलेल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून 'हिंदोस्ता' समूह गायन सादर करण्यात आले.

स्वातंत्र्यसंग्रामाच्या अग्निकुंडात भगतसिंग, राणी लक्ष्मीबाई, मंगल पांडे इ. अनेक क्रांतिकारकांनी आपल्या प्राणांची आहूती दिली, ह्याच कथानकावर आधारित 'आझादी ' हे हिंदी नाटुकले जे 55 व्या युवा महोत्सवात प्रथम क्रमांकाने विजयी झाले त्याचे सादरीकरण करण्यात आले. पंच्याहत्तर वर्षानंतर प्रलोभनांना भुलून स्वातंत्र्याचे मोल विसरलेल्या उन्मत्त झालेल्या तरुणाई च्या डोळ्यात अंजन घालण्याच सामर्थ्य ह्या नाट्यप्रकाराने यशस्वीरित्या पेललं.

भगवती भारतमातेलाच शाश्वत सौख्य मानणारे वीर सावरकर ह्यांच्या 'जयोस्तुते' ह्या पद्य रचनेवर अप्रतिम कथ्थक नृत्य विद्यार्थीनींनी सादर केले.

55 व्या युवा महोत्सवात प्रथम फेरीत प्रथम क्रमांक पटकावलेला 'दुल्हन' हा एकपात्री नाट्यप्रयोग प्रेक्षकांना अंतर्मुख करून गेला.

स्टार स्टुडंट ह्यांचे विशेष' सारे जहां से अच्छा 'समूह गायन सादरीकरण झाले.

त्याप्रमाणे प्राध्यापकवृंदाने विविध देशभक्तीपर गाण्यांचा सुंदर मिलाप करुन बहारदार समूह गायन सादर केले.

अशाप्रकारे एकूण 07 सादरीकरणे 100 ते 125 विद्यार्थ्यांच्या व 25 शिक्षकांच्या उपस्थितीत संपन्न झाली.साधारण 32 विद्यार्थ्यांनी सादरीकरणात सहभाग घेतला. एकूण 25 विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थितीत होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका मानसी जंगम व अभिषेक नेमाणे, दक्षता पाटील ह्या विद्यार्थ्यांनी केले.

डॉ. मुग्धा बापट व स्वप्निल मयेकर ह्यांनी आयोजन समिती, सी.एस् रोहित बापट ह्यांनी रंगमंच व्यवस्था, प्रसिद्धी व अहवाल लेखनाची जबाबदारी कोमल बापट ह्यांनी, डिसीप्लीन समितीची जबाबदारी सुदाम अहिरराव, लेखा विभागाची जबाबदारी सी.एस् मधुरा जोशी ह्यांनी तर स्वागत समिती व्यवस्था मनीष गोसावी इ.सर्व प्राध्यापक वर्गाने सक्षमपणे सांभाळली.

आभार प्रदर्शन शिक्षक समन्वयक स्वप्निल मयेकर सर ह्यांनी केले.कार्यक्रमांती सर्वांना अमृतमहोत्सवानिमित्त मिष्टान्न म्हणून महाविद्यालयातर्फे पेढ्यांचे वाटप करण्यात आले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

डॉ. मुग्धा बापट
टॅलेंट व कल्चरल कमिटी




SHI BEDEKAR COLLE
GPS Map Camera
Google
Thane, Maharashtra, भारत
Building No 4, Jnandweep, Chendani Bunder Road, Jambli Naka, Thane West, Thane, Maharashtra 400601, भारत
Lat 19.189082°
Long 72.980127°
16/08/22 11:55 AM


Swarasampada
Committee
Teacher's
GPS Map Camera
Thane, Maharashtra, भारत
Building No 4, Jnandweep, Chendani Bunder Road, Jambli Naka, Thane West, Thane, Maharashtra 400601, भारत
Lat 19.189064°
Long 72.980106°
16/08/22 01:09 PM
Google


Dr. Suchitra Naik
Principal
Inspirator & Guide
Cultural Program
16th August, 2022
GPS Map Camera
ठाणे, महाराष्ट्र, भारत
5XQH+PWV, जाम्बली नाका, ठाणे पश्चिम, ठाणे, महाराष्ट्र 400601, भारत
Lat 19.189178°
Long 72.979767°
16/08/22 11:57 AM
Google